ं. ठाणे
१९६६
REFBK-0015568
REFBK-0015568

# उत्तरायण

वा. ना. देशपांडे

७३८२१
४।३।६९

९८७०

[illegible] ग्रंथ संग्रहालय, [illegible]
[illegible] ७३८२१ दि. [illegible]
[illegible] ९८७० [illegible] ४।३।६९

# उत्तरायण

वामन नारायण देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६८

किंमत तीन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धि योजना
१९७०

REFBK-0015568
REFBK-0015568

व्हीनस प्रकाशन : पुणें

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
' तपश्चर्या '
३८१ क, शनिवार पेठ : पुणें २

* * *

प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९६६

* * *

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

* * *

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ : पुणें २

# अनुक्रमणिका

## ( १ ) स्फुट रचना


| कविता | पृष्ठ |
|---|---|
| १ नवी पालवी | १ |
| २ नीलांबरी | १ |
| ३ तरूंनो ! | २ |
| ४ निळें | ३ |
| ५ कवि | ३ |
| ६ केळींचीं झाडें | ४ |
| ७ स्पर्श | ५ |
| ८ वाटेकरी | ५ |
| ९ वाटणी | ६ |
| १० जपणूक | ७ |
| ११ हिममानव | ८ |
| १२ मनोरा | ९ |
| १३ तपानंतर | ९ |
| १४ शेतांत | १० |
| १५ इंद्रधनुष्य | ११ |
| १६ स्वप्नांत | १२ |
| १७ तलावावर | १२ |
| १८ वादळ | १३ |
| १९ मूळ | १४ |
| २० कावड | १४ |
| २१ अग्नि | १५ |

| | | |
|---|---|---|
| २२ | बाउल | १६ |
| २३ | भरपाई | १७ |
| २४ | उपेक्षित | १७ |
| २५ | क्षितीज | १८ |
| २६ | कालगरुड | १९ |
| २७ | व्यथा | १९ |
| २८ | पौषांत | २० |
| २९ | वृष्टि | २१ |
| ३० | बाहुलीचें गाऱ्हाणें | २१ |
| ३१ | अंकुर | २२ |
| ३२ | कंदील | २३ |
| ३३ | थाली | २४ |
| ३४ | तेंच तें | २४ |
| ३५ | त्यासाठीं | २५ |
| ३६ | स्वतांहून | २६ |
| ३७ | दुजें कांहीं | २६ |
| ३८ | गौरव | २७ |
| ३९ | छाया | २८ |
| ४० | कुरणांतून | २९ |
| ४१ | कधीं ? | २९ |
| ४२ | कवडसा | ३० |
| ४३ | ती घटना | ३१ |
| ४४ | दरींत | ३२ |
| ४५ | आविष्कार | ३३ |
| ४६ | भिवया | ३४ |
| ४७ | इच्छा | ३५ |
| ४८ | दुपार | ३५ |
| ४९ | शल्य | ३७ |
| ५० | घड्याळ | ३७ |

| | | |
|---|---|---|
| ५१ | धागे तुटतांना | ३८ |
| ५२ | उपासना | ३९ |
| ५३ | ' अर्थ द्याया ' | ३९ |
| ५४ | हळूंहळूं | ४० |
| ५५ | ओढ | ४१ |
| ५६ | साधना | ४१ |
| ५७ | अट | ४२ |
| ५८ | तरी | ४२ |
| ५९ | पावले | ४३ |
| ६० | असोशी | ४३ |
| ६१ | प्रो. फ्रेड हॉइल यांस | ४४ |
| | **( २ ) प्रदीर्घ रचना** | |
| ६२ | निहालांची टोळी | ४५ |
| | टीपा | ५२–५४ |

* * *

# शुद्धिपत्र

[ किरकोळ अशुद्धें सहज लक्षांत येणारीं असल्यानें दुरुस्त केलीं नाहींत. ]

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २० | १८ | कर्धी | कधीं |
| २५ | तळाचें काव्यनाम | स्वतांहून | त्यासाठीं |
| ३१ | ,, | दरींत | ती घटना |
| ३४ | ६ | भिसळलेलीं | मिसळलेलीं |
| ४३ | १ | गंघांत | गंधांत |
| ४६ | ९ | घदा | धंदा |
| ५० | २ | [ कवितेच्या १२० चरणानंतर मोकळी जागा—स्पेस्—हवी. ] | |
| ५३ | ७ | लावधि | लावली |
| ,, | ८ | होतीं | होतों |
| ,, | १० | संपद्रायांत | संप्रदायांत |

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दां. क्र. १५५६८

## नवी पालवी

झाड असो नवें किंवा जुनें,
फुटतीं त्या नवीं नवीं पानें !
झाडांमधें खोल कुठें तरी
नवतेचा स्त्रोत वास करी !
त्यावीण कां जुन्याही झाडातें
पुनः पुन्हां पालवी फुटते ? १

नवतेच्या त्या स्त्रोतामधून
झाडांनो ! द्या थेंब चार – दोन !
सुकावया पाहे माझें मन,
नको व्हाया तें काष्ठासमान !
येऊं द्या त्या पुन्हां टवटवी
नवी नवी फुटून पालवी ! २

* * *

## नीलांबरी

ओंकार ठाकुराची नीलांबरी
ासशी तूं ऐकली तरी ती ऐकून घे झडकरी ! १

गायक करी तींत जादुगिरी :
भंगल्या हृदयाचें स्पंदन उमटवी स्वरोस्वरीं ! २
माझ्याही हृदयाची तीच गत :
भंगून तें करितें क्रंदन तुजसाठीं अविरत ! ३
शब्दांत कशी आणूं माझी व्यथा ?
गीतीं जी व्यक्त होई समज तीच माझी उत्कटता ! ४
त्यासाठीं ठाकुराची नीलांबरी
नसशी तूं ऐकली तरी ती ऐकून घे झडकरी ! ५

* * *

## तरूंनो !

तरूंनो ! तुम्हां होतो तसा कां मला न हो आनंद असण्याचा ?
कशास हा मजला हव्यास कांहीं तरी वेगळें व्हावयाचा ? १
तुमचा तो आनंद तुम्हांस वितरितो अखंड मनःशांति,
नसती काय आली तशीच जीवनांत मजही अनुभूति ? २
आनंद असण्याचा खचित पुरें होई जगणें जगायला —
वेगळें–आगळें कां व्हायची मग ओढ लागावी मन्मनाला ? ३
" रुचेल काय तुम्हां व्हायला कल्पद्रुम ? "–पुशिलें जरी कुणी,
पानांची फडफड करून तुम्ही द्याल नकार त्याच क्षणीं ! ४
तुमचा हा निर्धार कुठून लाभायचा मजला दुर्बलास ?
— जें होणें असंभव तेंही मी व्हावयाचा करितों अट्टहास ! ५
खेळ हे जाणिवेचे ! – मानवां आम्हां तीच सारखें नाचविते !
तिजला वर म्हणूं अथवा म्हणूं शाप ?– न कळे मन्मतीतें ! ६
तरूंनो ! तुम्ही मला शिकवा घ्यावयास आनंद असण्याचा,
कशास हा मजला हव्यास कांहीं तरी वेगळें व्हावयाचा ? ७

* * *

## निळें

निळें निळें जल वाहे नदींतलें.
चास निळे झेंपावत सव्य गेले !
सुदूरची रांग निळी डोंगराची,
पसरलें माथ्यावर नभ निळें. १

–सायंकाळीं निळी शोभा विलोकिली.
आवडला रंगांमधें रंग निळा !
आठवली तोंच तुझ्या कचांतली—झांक निळी—!
तेव्हां कळे निळेंच कां आवडलें ! २

* * *

## कवि

[ मुक्तओंवी ]

पुराणें सांगतात ;
आहेत स्वर्गांत गायक
गंधर्वांसारखे ;
आहेत तेथें नर्तिका
अप्सरांसारख्या.
पण नाहींत तीं सांगत
तेथें कवि असल्याचें !

वेदनेला शब्द देणें
आहे कवीचें काम
वेदनाच नाहीं स्वर्गांत,

तर कुठून असणार
तेथें कवि ?

वेदनेचें माहेरघर
आहे ही धरा ;
म्हणून तिजवर आहे १५
कवीचें वास्तव्य !

* * *

## केळीचीं झाडें

केळीचें झाड एकीकडून
किती झुकलें—किती वांकलें !—
जरी अजून केळांचे घड
त्या वांकवाया नच लागले ! १

या झाडापाशीं झाड केळीचें
आहे आधींचें फोंफावलेलें,
दाटीकारणें दोन्ही झाडांचें
पानांत पान मिळून गेलें ! २

उभय झाडें एकमेकांला
जरी झटतीं लोटाया दूर,
परि पहिल्या झाडाचा झाला
पूर्ण वाढीनें अधिक जोर ! ३

म्हणून झाड वांके दुसरें—
पुढें अधिक तें वांकणार !

तें पहिल्याच्या फार जवळ
फुटलें हेंच ये मुळावर ! ४

* * *

## स्पर्श

झाडालागीं पुसा तुम्ही, " वसंतश्री तूंतें
स्पर्शूनिया गेली याला प्रमाण कोणतें ? "
उत्तरेल झाड, " नाहीं प्रत्यक्ष प्रमाण !
मात्र आली मजलागीं पालवी नवीन ! " १

कुणी मला विचारितां " तुझिया प्राणातें
प्रीतिस्पर्श झाला याला प्रमाण कोणतें ? "
उतरेन मीही, " नाहीं प्रत्यक्ष प्रमाण !
मात्र आला गीतांलागीं बहर नवीन ! " २

* * *

## वाटेकरी

वठलेल्या एका जुन्या झाडाच्या टोंकाला
दोन फांद्या सुकलेल्या होत्या दो बाजूंला :
खिस्ताला ज्या खांबावर खिळून मारलें,
त्याशीं साम्य या झाडाचें कांहींसें दिसलें ! १

खिस्त जगीं विद्यमान असता आजला,
खांब दुजा नको होता खिळाया त्याजला !
हेंच झाड कामीं येतें त्याच्या वधासाठीं
ठोकूनिया हातोडीनें खिळे हातीं–पोटीं ! २

ख्रिस्त आज नाहीं हेंच भाग्य खरोखरी !
कुणा ठावें, आपणही होतों वाटेकरी —
वधस्थानीं तया नेतां गोटे मारण्यांत,
" देवपुत्र, देवपुत्र ! "— त्या हिणविण्यांत ! ३

* * *

## वाटणी

( मुक्तओवी )

कबिराच्या शवाजवळ
जमले त्याचे भक्त
हिंदु आणि मुसलमान.
हिंदु भक्तांना हवें
त्याच्या शवाचें दहन.
मुसलमान भक्तांना हवें
त्याचें दफन.
आले दोन्ही पक्ष
एकेरीवर !

इतक्यांत कुणी तरी
केलें दूर बाजूला
शवावरचें कफन.
तेव्हां काय चमत्कार,
फुलें झालेलीं आढळलीं
कबिराच्या शवाचीं !
नंतर त्याच्या भक्तांनीं
घेतलीं वाटून फुलें

आणि केला त्यांचा अंत्यविधि
आपापल्या रिवाजाप्रमाणें !

होण्यापूर्वीं वाटणी
फुलांच्या ढिगाला असणार
कांहीं ना कांहीं आकार.
होता तो आकार
अखंड भारतासारखा —
असें जर कधीं काळीं
सिद्ध होऊं शकलें,
तर नको त्याबद्दल
वाटायला आश्चर्य !

* * *

## जपणूक

चोखामेळ्यापरी भक्ति सुदूरची
करितों मी तुझी ;
—असूं दे मनांत जाणीव तूं याची !   १

अनामिकाला त्या विठ्ठलमंदिरीं
नव्हता प्रवेश ;
परंतु न झाला निराश अंतरीं !   २

कधीं कळसच पाहून दुरून
दर्शन झाल्याचें
आपल्या मनीं तो मानी समाधान !   ३

कधीं मंदिराच्या आधाराशीं येई ;
तेथूनच फुलें
विठ्ठलाच्या नांवें उधळून देई ! ४

न घडे दर्शन, न पादसेवन,
ऊरभेट कैंची ?
तरीही तो भक्ति करी रात्रंदिन ! ५

तशीच – तशीच – भक्ति सुदूरची
करितों मी तुझी ;
— असूं दे मनांत जाणीव तूं याची ! ६

* * *

## हिममानव

हिममानवाला हिमाचलामधें नको शोधायातें,
आतां तो न तिथें ! १
तेथलीच काय, धरेवरचीही वसती तयाची
सरली कधींची ! २
मात्र डोकावून पाहतां आपण आपल्या मनांत
दिसेल तो त्यांत ! ३
पूर्वज आपला ! – तुमच्या-आमच्या मनीं वसण्याचा
अधिकार त्याचा ! ४
हिममानवच आपण आंतून ; जरी बाहेरला —
देखावा निराळा ! ५
आली आपणांत हिममानवाची सारी पिशुनता !
— न झांके झांकतां ! — ६
म्हणून म्हणतों, हिमाचलाकडे नको धांव घ्याया
तया शोधावया ! ७

हिममानवास पहाया असती जे आतुर त्यांनीं
डोकावावें मनीं ! ८

* * *

## मनोरा

आधींच हो उशीर चढावया मनोरा,
केवढी त्याची उंची ! – पायऱ्याही त्या किती !
चढलों न चढलों दहा–वीस पायऱ्या,
होऊन सांज तम भरूं लागे दिगंतीं ! १

मनोऱ्यावर कसा काळोखांत चढूं मी ?
चढलों तरी कसें भंवतींचें दिसेल ?
वाटते खंत हीच : चढलों मी जितकें,
तितकें सारें, सारें झालें आहे विफल ! २

येतील उतरतां पायऱ्या ज्या चढलों,
परंतु तेंही कसें काळोखांत साधावें ?
जेथें मी आहें तेथें आतां मज असूं द्या :
पुढचें पुढें–जेव्हां दिन नवा उगवे ! ३

* * *

## तपानंतर

सह्याद्रीच्या परिसरीं विहरण करुन
तप गेलें होऊन !
माझ्यामागें कसा दिसे ? – रम्यच कां अजूनी ? —
— कधीं कधीं ये मनीं ! १

गिरि – दरी युग्मकांचा तेथें चिर निवास,
चाले त्यांचा विलास !
मग चिर सौंदर्यानें कसा नसे नटला
परिसर तेथला ? २

परिसरा कैंची माझी पामराची जाणीव ?
—कैंचा माझा आठव ? —
फोल भाषा मुकण्याची परिसर मजला,
मीच मुके त्याजला ! ३

* * *

## शेतांत

त्या दिनीं दवंडी गांवामधें झाली :
" फिरे आसपास निहालांची टोळी ;
उभें पीक ती ने तोडून – लुटून ,
करा रे शेतांची राखण झटून ! " १

रात्र होतांक्षणीं शेतास सत्वर
महादू जाऊन बसे माचावर.
चंद्राच्या फिकट प्रकाशांत त्याला
जोंधळा खूपच दिसे फोंफावला !
शेतमाऊलीची करुणा भाकून
सावधगिरीनें तो करी राखण. २

मधेंच रिकामा डबा तो वाजवी ,
मधेंच भरारा गोंफण चालवी.
अधूनमधून देतसे हांकेला,
दुज्या शेतांतल्या राखणदाराला. ३

रात्रीचा जाहला तिसरा प्रहर
वाहाया लागला वारा गार गार.
चंद्राची वावडी उंच उडालेली
अस्तगिरीपार तुटून पडली !
काळोख वाढून शिणला — भागला
महादू सर्वेच निद्राधीन झाला ! ४

हळूंच निहाल शेतांत शिरती,
हळूंच कणसें तोडाया लागती.
आले तसे गेले ते लूट घेऊन
कानोसाही मुळीं न लागूं देऊन ! ५

महादू हो जागा होतां किलबिल,
माचावरूनच पाही भंवताल :
शेतांतला एक कोपरा सगळा
कणसें नसला दिसला तयाला !
समजायचें तें सारें समजून
कपाळावरती हात घे मारून ! ६

* * *

## इंद्रधनुष्य

थांबली आतां झड सुटला शीतवात
सुरंगी इंद्रधनु प्रगटे आकाशांत. १

मानिती कुणी कुणी : धनु तें घे जनन
सर्पाच्या फणेंतील तेजाळ मण्यांतून ! २

खरीच समजूत : अदृश्य विषधर
नभाची फणा धरी धरेच्या शिरावर ! ३

नभाच्या त्या फणेंत झळके सूर्य – मणी,
काय न इंद्रधनु निघालें त्यामधूनी ? ४

* * *

## स्वप्नांत

बालक झोंपेमधें भीतीनें ओरडलें :
भयद कांहीं तरी स्वप्नांत त्या दिसलें ! १

बालका ! स्वप्नामधें द्यावया धीर तुला
स्वप्नांत बाहेरून शिरतां ये कुणाला ? २

आहे रे तुला तुझ्या आईचा निदिध्यास,
येईल स्वप्नीं तीच धांवून साहाय्यास ! ३

* * *

## तलावावर

पुनवेचें चंद्रबिंब तलावामधलें
पहाया मी आलों-परि न दिसे तो योग !—
माझ्याआधीं त्या स्थलीं जे दोघे-तिघे आले,
ते सारखे तलावांत फेंकिती दगड !
हालचाल होतां जलीं कुठून तयांत
उमटेल प्रतिबिंब चंद्राचें नेटकें ?
सौंदर्याचा अनादर कराया मानव
धजतसे कसा ?
आणि इकडे नभांत
क्षितिजाशीं असणारे कांहीं ढग वर
चढूनिया त्यांनीं चंद्र झांकला पुरता.

त्यांतून तो कसला ये सत्वर बाहेर ?
आतां कैंचें प्रतिबिंब ?—कैंची सुंदरता ?
चंद्र, तसा, तलावही निर्मिला निसर्गें,
जलांतलें प्रतिबिंब—त्याचीच निर्मिति !
कसा मग तो ढगांना चंद्र झांकू देई ?
उदासीन कां तो असे सौंदर्याविषयीं ?
—प्रश्न चित्तीं उठतात !

त्याच तंद्रीमधें
आपोआप घराकडे वळलीं पावलें !

* * *

## वादळ

घराचा, देवळाचा, पडक्या सराईचा,
निवारा नसतांना झाडाचा, दरडीचा— १

उघड्या माळावर तुफान वादळांत
एकटें सांपडावें आपण अवचित; २

वाऱ्यानें धूलिमय व्हाव्यात दिशा दाही,
क्षणांत रपरप पडावा पाऊसही; ३

हवेस चिरणारे विजांचे ध्वनी व्हावे,
होऊन ओलेंचिंब थंडीनें गारठावें; ४

—निसर्गकोप सारा सोसावा धिमेपणें
'थांबेल लौकरच वादळ !'–या आशेनें; ५

आणि तें खरोखर थांबतें दो घडींनीं,
निघतों घरीं जाया आपण परतोनी ! ६

प्रत्यक्ष अनुभव आल्यानें उमगतें :
घडी दो घडींहून वादळ न टिकतें ! ७

* * *

## मूळ

झाडाचें मूळ वसे धरतीच्या उदरीं
घनदाट तिमिरीं. १

— विझल्या तारकेच्या ग्रहावर देखील
तसें तम नसेल ! — २

न मिळे मुळालागीं किरणही तेजाचा,
सूर्याचा ना चंद्राचा ! ३

मूळ तें ज्या तरूचें त्या प्रकाश मिळावा,
पानीं–फुलीं तो यावा— ४

म्हणून तें आपण तसीं सदा राहतें
अगोचर जगातें ! ५

* * *

## कावड

तीर्थजलाच्या कावडी घेऊन
जातां दिसले आज भक्तगण.
चालत आले जरी ते दुरूनी,
शीणभाग ना तयांच्या वदनीं !
पाय सर्वांचे पडती सारखे,
कावडींचेही सारखेच झोंके.

त्या तालावर गीत गात गात
उत्कंठेनें ते वाट चालतात.
इष्ट स्थलातें खास पोंचतील,
निज दैवता तीर्थें न्हाणतील ! १

मीही आपली कावड घेऊन
इष्ट स्थलातें कां नच जाईन ?
आणि आपल्या दैवतालागून
तीर्थजलानें कां नच न्हाणीन ?
परंतु आतां देहीं नुरे त्राण,
केवळ जाया कंठीं उरे प्राण !
कैंचें दैवत ?— —अभिषेक कैंचा ?—
हेत मनींच राहिला मनाचा !
कावडीसाठीं जे घडे भरले,
जागच्या जागीं सुकत चालले ! २

* * *

## अग्नि

[ मुक्तछंद ]

गारगोटींत अग्नि वसतो :
तो प्रगटून पेट घेतांच
खेडें सगळें जाळावयाची
क्षमता ठेवी !

शमीवृक्षांत अग्नि वसतो :
तो प्रगटून भडकतांच

रान समूळ दग्ध कराया
शक्त होतसे !

मानवाचिया जठरामधें अग्नि वसतो :
हवी रोजचा त्या न मिळतां
तो उफाळून धडधडतो !
पुढतीं त्याच्या जें जें येतसे—
—ओलें वा सुकें, भलें वा बुरें—
तें तें अवघें भस्म करतो !
आणि सत्तेच्या सिंहासनाची
पूर्णाहुति घे तेव्हांच मग
तो शांत होतो !

* * *

## बाउल

बाउल माझ्यांतला फिरतो शोधायातें
'मनाच्या माणसा'तें १

माणूस तें शोधणें सहजसाध्य नाहीं—
जाणून आहे तोही ! २

परंतु शोधण्याचें मिळाया समाधान
तो फिरे वणवण ! ३

फिरतां एकतारी छेडून अंगुलीनें
गाई तो त्यातें गाणें. ४

शोध हा बाउलाचा कधींचा चालू असे,
तयांत खंड नसे ! ५

फिरतां जनींवनीं पायांची हो चाळण,
सर्वांगीं दाटे शीण ! ६

छेडतां एकतारी करांत कंप भरे,
गीत न सुचे पुरें ! ७
तरीही शोधण्याचें मिळाया समाधान
तो फिरे वणवण ! ८

* * *

## भरपाई

चमचमणारे तारे गगनींचे,
निळे दिसणारे डोंगर दूरचे ;
झाडें तशा वेली रानावनांतील,
झुळझुळणारे तेथले ओहळ ;
– हीं दिव्यें अवघीं माझ्या आवडीचीं
स्मरणेंच त्यांच्या दाटी रोमांचांची ! १

परि जें हो प्रिय तें माझ्या बाहेर !
माझ्यामधलें तें कसें असणार ?
माझ्यांत नसे तें प्रिय व्हावें मातें –
हें माझ्यापुरतें अटळ दिसतें !
अल्प भरपाई करावी म्हणूनी
छबी त्या दिव्यांची वागवितों मनीं ! २

* * *

## उपेक्षित

खिडकीशीं माझ्या आहे झाड केळीचें,
नवें पान रोज थोडें वाढे तयाचें. १

वाढण्याचा सूक्ष्म ध्वनि होत असेल,
परि कसा एकाएकीं ऐकूं येईल ? २

असतील विश्वांतरीं आणखी ध्वनि
सहज जे नच येती ऐकाया कानीं ! ३

अनायासें ऐकू येती तेच ऐकून —
दुजे ध्वनि उपेक्षिती जगतीं जन ! ४

उपेक्षिल्या ध्वनींचाच ध्यास घेऊन
संवेदना सूक्ष्मतर करूं आपण ! ५

हेच ध्वनि आधीं हवे परिसावया,
तयांचाच भाव हवा जाणून घ्याया ! ६

* * *

## क्षितीज

त्यानें आपली होडी लोटली सागरांत,
परि गवसे सत्वरच ती वादळांत !
होडीभोंवतीं उत्तुंग लाटा उठतात :
त्यामुळें त्याचें क्षितीज झालें संकुचित !
—लाटांसवें तें आहे सतत बदलत ! १

'याचें क्षितीज नाहीं विशाल, नाहीं स्थिर !'—
असें तुम्ही त्या हिणवाया कां म्हणणार ?
जेथें वाटतें : होडीसह तो बुडणार,
तेथें कशाला क्षितीजाचा हा बडिवार ?
—लाटा थांबतां क्षितीज भव्य बनणार ! २

* * *

## कालगरुड

कालवैनतेय उत्तुंग उड्डाण मनाच्या गतीनें करी
दिवस–रात्रीचे पंख नवलाचे पसरून दूरवरी ! १

उडतां उडतां तीक्ष्ण नजरेला तयाच्या दिसून आले
गोल आकाराचे, धवल रंगाचे ग्रह-तारे नभांतले. २

वाटले असावे तयास ते कोश नागिणीचे कुणा तरी,
म्हणूनच पंख फडफडवून झडप घे त्यांच्यावरी ! ३

कराल चंचूनें एकेका गोलाचा करील तो चुरा चुरा :
सर्प-कल्पनेनें विथरून जावें--स्वभावच बने पुरा ! ४

या ग्रह-ताऱ्यांत आपली धराही आहे दूर कोपऱ्यांत,
व्हावयाची आहे इतरांची तीच अखेरीस तिची गत ! ५

कांहीं असो, धरा आजच्या घडीला निर्मी कोटि कोटि जीव,
—कालगरुडाचा धरेनें केलेला नाहीं कां हा पराभव ? ६

* * *

## व्यथा

वदला मूर्तिकार : "आदर्श अंगनेची मूर्ति मी
निर्माण करण्याची आकांक्षा धरितसें नेहमीं. १

सौंदर्य, पवित्रता, प्रतिभा– तीन गुण मूर्तींत
प्रगट होवोनिया रसिक व्हाया हवे मुदित ! २

हे गुण एकत्रित अजून मज नच दिसले,
प्रचीति आल्यावीण कलेंत माझ्या येती कुठले ?" ३

म्हटलें मीं : "तूं तशी अंगना पाहिली न म्हणून
मूर्ति न घडविशी तुझ्यांत मूर्तिशिल्प असून ! ४

हे गुण एकत्रित मजला जरी झाले प्रतीत,
मूर्तींत कसे आणूं ?-कुठून मूर्तिशिल्प माझ्यांत ?" ५

* * *

## पौषांत

आकाशाचें पांघरूण
रात्रीं शीत गरिबांचें
कसें करी निवारण ?
तारा-छिद्रें त्या पडून
जागोजाग फाटूनिया
गेलें आहे तें विरून ! १

भरजरी आतपाचें
वस्त्र दिनीं त्यांचें शीत
निवारील दो घडींचें !
उरलेल्या दिवसांत
त्यांनीं काय देहीं ल्यावें ?
निवारावें कसें शीत ? २

शीत जाया गरिबांचें
मिळावें कां वस्त्र फक्त
आकाशाचें-आतपाचें ?
कधीं त्यांना मिळायचें
अंगभर ल्याया वस्त्र
साधेसुधें नेहमींचें ? ३

* * *

## वृष्टि

निर्मल झालीं पानें,
निर्मल झालीं मनें !

पाऊस पडल्यानें
झाडांच्या पानांवर
जमली सारी धूळ
धुऊन गेली पार ! १

आंसवें गाळल्यानें
मनांत असलेलें
किल्मिष तुझ्या–माझ्या
वाहून पार गेलें !

निर्मल झालीं पानें,
निर्मल झालीं मनें ! २

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९५५६८
संग्रह शाखा

* * *

## बाहुलीचें गाऱ्हाणें

अशी कशी मतलबी बाळाची आई ?

बाळाला ती पाळण्यांत
निजविते, गाते गीत;
मलाच कां भुईवर टाकून देई ? १

बाहुली न मी केवळ—
बाळाचें मी आहें बाळ !
ऐन वेळीं विसरून कशी ती जाई ? २

पाळण्यांत मीं निजावें,
श्याळ खालीं पहुडावें—
हौस माझी ही केधवां फळास येई ? ३

येतां–जातां बाळापरी
भोकांड न मी पसरी—
म्हणून कां माझी अशी आबाळ होई ? ४

* * *

## अंकुर

सर्वांच्या हृदयीं वसतो अंकुर
कुठें करपतो, कुठें फोंफावतो ;
परि न वंचित कुणी नारी–नर ! १

हवें प्रीतिजल मिळाया अंकुरा :
मग तो कुठून जाई करपून ?
पाहतां पाहतां वाढेल भरारा ! २

असंख्य त्या फांद्या, पानें फुटतील ;
त्याचा तरुवर होतां डौलदार
ज्याची त्याला त्याची सांवली मिळेल ! ३

आणि पथीं पांथ एखादा जाणारा
उन्हानें तापतां शिणतां–भागतां
याच तरुखालीं घेईल निवारा ! ४

* * *

# कंदील

अजून नव्हती रजनी सरली,
अजून नव्हती पहाट फुटली.
नव्हता नभांत शुक्र उगवला,
कोंबडा न बांग द्यावया लागला. १

तरीही निर्जन पथीं कवणाचा
दिसतो कंदील क्षीण प्रकाशाचा ?
कंदील सारखा पुढें पुढें सरे,
पवनाकारणें ज्योत थरथरे. २

पदयात्रिकांचा जात आहे मेळा
एका गांवाहून दुसऱ्या गांवाला.
पहाटेची वाट यात्री न पाहती,
नच तिमिराची बाळगती क्षिती ! ३

'स्वामित्व-भावना आपण होऊन
सोडतां समता ये ममतेंतून.
नातरि अटळ भीषण यादवी !'
—सांगाया चालले लोकां गांवोगांवीं. ४

कंदील लागला जाया दूर दूर,
थोड्याच वेळांत गेला दृष्टीपार.
इकडे नभांत शुक्र उगवला,
कोंबडाही बांग द्यावया लागला. ५

* * *

## थाली

लोककथा सांगे : फार जुन्या कालीं
प्रजेसाठीं थाली
मिळवाया ओढ भूपाला लागली. १
थालीसाठीं वनीं तप करायला
भूप जों निघाला,
सवें नगरीचा ये प्रजेचा मेळा. २
नदी--जलीं उभे अवघे राहती,
मंत्र जपताती ;
थालीदाता सूर्य भावें आराधती. ३
सूर्य भूप-मनीं प्रगट होऊन
वदला वचन :
" भूपा, मिळे थाली कलींत कुठून ? ४
द्रौपदीची थाली भूमीमधें झाली
गुप्त त्याच वेळीं—
ती भूमीच आतां थाली कलींतली : " ५
—हें ऐकून भूप सकलांसहित
नगरा परत
जाई सूर्य-वच चिंतीत चिंतीत ! ६

* * *

## तेंच तें

तेंच तें हृदय, तीच ती भावना,
तेच ते शब्दही सुचतात मना. १
हृदय अजून बदललें नाहीं,
भावनेमधेंही पालट न कांहीं ! २

शब्दांमधें कसा बदल घडावा ?
कसा नवेपणा त्यांत उतरावा ? ३

मनीं उठणारे शब्द जुने जरी,
त्यांसवें येणारे अश्रु नवे तरी ! ४

* * *

## त्यासाठीं

थांबव, थांबव कालविहगा ! तूं आपली भरारी,
तोल सांभाळून पंखांवर स्थिर राही पळभरी. १

तुझे दीर्घ पंख एकदांच जरी खालींवर होती,
तरी तेवढ्यांत भूलोकींचीं कैक वर्षें उलटतीं ! २

नित्य नवें नवें सौंदर्य जगतीं येत प्रत्ययास,
परंतु आहे रे भंगुरपणाचा अभिशाप त्यास ! ३

स्थिर तूं होतांच वर्तमान काळ दीर्घता पावेल :
मग दीर्घजीवि सहज येथलें सौंदर्य होईल ! ४

त्यासाठीं थांबव कालविहगा ! तूं आपली भरारी,
तोल सांभाळून पंखांवर स्थिर राही पळभरी. ५

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७३०२९
१०७०

## स्वतांहून

व्हावया वसंताचें आगमन
नको त्या शोधावया वनोवन,
नको त्या द्यावयाही निमंत्रण !
त्याकडे कोण कसा ये जाऊन ? १

शिशिर अजूनही संपला न !
तोंवर शीत साहूं सारे जण !
शिशिर सरतांच स्वतांहून
होईल वसंताचें आगमन ! २

[* * *

## दुजें कांहीं

नदीकांठीं हिंडतां दिसत
तरंगतीं बदकें जलांत.
थोडीं थोडीं तीं हंसांसारखीं,
मात्र त्यांच्या सौंदर्या पारखीं ! १

बदकांची भाषा जरी येती,
पुशिलें मीं असतें त्यांप्रती :
"काय चित्तीं तुमच्या न येई
रम्य हंस व्हावें आपणही ?" २

बदकांनीं म्हटलें असतें :
"कां इच्छावें हंस व्हावयातें ?
असण्याचा मोद आम्हां पुरे ;
नको कांहीं व्हावया दुसरें !" ३

बदकांनो ! तुम्ही न सांगतां
तुमचा हा भाव ये जाणतां.
असण्याचा मोद आम्हांसही ;
—परि तेंच सर्वस्व न होई ! ४

दुजें कांहीं व्हावयाचा ध्यास
जन्मजात आम्हां मानवांस !
म्हणूनच अश्मयुगांतून
अणुयुगीं पोंचलों येऊन ! ५

होण्यालागीं आमच्या न अंत,
चालतसे होणें अविरत !
त्यांत कष्ट, कधीं अपजय,
—सुखदच परंतु उभय ! ६

अरे, सारीं बदकें चाललीं—
प्रवाहास खालच्या लागलीं !
कां तीं माझे बोल ऐकतील ?
—मीही माझी संपवी सहल. ७

* * *

## गौरव

दहा—बारा झोंपड्यांचें गांव चिमुकलें
बालपणीं कैक वेळां मीं होतें पाहिलें :
आगींत तें एकाएकी भस्मसात झालें,
न पुन्हां वसलें !
आज त्याचें स्मरणही न कुणा उरलें ! १

मात्र माझ्या स्मृतीमधें तें गांव वसतें,
जीवंत मी जोंवर तें नांदणार तेथें !
मग मातें जें घडेल तें घडे तयातें :
— जाईल लयातें !—
कधीं काळीं होतें – हें न कळेल कुणातें ! २
स्मृतींतलें अस्तित्व ही कालावर मात :
परंतु तें असावया हवें अखंडित !
चिमुकल्या गांवाच्या हें कुठलें भाग्यांत ?
एकदां जगांत
तेंही होतें यानेंच तें झालें गौरवित ! ३

* * *

## छाया

अंगणामधल्या अबोलीचीं फुलें तोडावया गेलों जेव्हां,
एका पानावर डौलांत बसला दंवबिंदु दिसे तेव्हां. १
अंगचाच रम्य असे दंवबिंदु ; सूर्याच्या किरणामुळें –
छोटें इंद्रधनु त्यांत प्रगटून सौंदर्य उतास आलें ! २
भान न राहून सौंदर्या धराया स्पर्शिलें तयातें करें :
सौंदर्य कशाचें ? – पाणी आलें हाता ! – दंवबिंदु तोही नुरे ! ३
पार्थिव सौंदर्य दिव्य सौंदर्याची छायाच केवळ जरी,
कशी ये स्पर्शितां – कशी ये धरितां – सांवली कवणा तरी ? ४

* * *

## कुरणांतून

कुरणांतून दोन – चारदां मला
जाण्या – येण्याचा योग जेधवां आला, १
तेधवां वाटे : पडली नवी वाट
नित्य टिकेल आहे तशीच नीट. २
इतरांच्याही येईल वाट कामीं,
नांव कायम राहण्याची ती हमी ! ३

पुढें मुद्दाम वाट पहाया गेलों :
दृश्य पाहून पुरा निराश झालों ! — ४
वाट कशाची ? – त्या जागीं येथें – तेथें
थोडें गवत दुमडलेलें होतें ! ५
जेव्हां कुरण सारें कापलें जाई,
तेव्हां उरेल खूण कुठली हीही ? ६

* * *

## कधीं ?

जनते ! तूं कधीं जागी होऊन
पावशील सुखातें ?
मतलबी तुझे नेते घेतात
जरी तुझ्या नामातें,
परोपरी साधतात स्वार्थातें ! १

आहे तुझ्या जीवालागीं लागली
समतेची असोशी.
श्रीमंतांनीं दंग व्हावें विलासीं,
तूं रहावें उपाशी !—
कुठवर सह्य व्हावें कुणाशीं ? २

समतेला आणावया परंतु
काय केलें नेत्यांनीं ?—
गुलामीच तुज दिली आपण
तानाशहा होऊनी !
—वंचनेची सीमा उरे कुठुनी ? ३

खऱ्याखुऱ्या समतेचें दर्शन
प्रत्यक्षांत घडावें ;
तानाशाही विलोपून अखंड
जनतंत्र नांदावें ;
व्यक्तिमात्रें विकासास साधावें— ४

हें घडाया निज सुप्त सामर्थ्य
व्यक्त कधीं करशी ?—
नेत्यांचाही नेता तूंच जनते !
कधीं त्यांना दाविशी ?—
—पुसतों मी उत्कंटेनें तुजशीं ! ५

* * *

## कवडसा

विश्व होण्याआधीं अवकाशभर
होता अंधकार ! १
त्या अंधारापरी दाटे घोर तम
हृदयांत मम ! २
पुढें विश्व व्हाया हो अवकाशांत
प्रकाश उदित. ३
माझ्या हृदयींही पडे कुठूनसा
एक कवडसा ! ४

असो चिमुकला,    असो मंदतेज,
सूर्य हो तो मज ! ५
देतसे उजेड,    देतसे ऊबही,
सर्वस्वच होई ! ६

* * *

## ती घटना

[ सुनीत ]

कालौघ जर उलट मागें वाहील,
गत जीवन अनुभवितां येईल :
एक घटना पुन्हां एकदां घडून
पुन्हां मिळेल मज चैतन्य नवीन !

शीतकालची होती तांबुस ती सांज,
तांबुस चंद्र उजळूं लागे क्षितीज.
श्रेयच अशा प्रेयाचा लाभ जाहला
सांज आणखी चंद्र हीं होतीं साक्षीला !

या घटनेनें नव चैतन्य मिळून
कंठूं शकलों ऐलथडीचें जीवन.
पैलथडीचें जर असेल जीवन,
तें कंठावया हवें चैतन्य नवीन !

परि कालौघ उलट कसा वाहील ?
कशी घटना ती पुनरपि घडेल ?

* * *

[ मुक्तओंवी ]

शिणलों मी खराच
विकट वाट चालून ;
पण नाहीं मी टाकणार
साधा उसासा देखील
शीण दर्शविणारा !

निघालों मी घरून
जी दरी पहायला,
तिच्या जवळ्यांत आतां
आहें मी उभा !
घुमतो पांच वेळां
सूक्ष्म आवाजही तींत
अशी आहे तिची ख्याति !
टाकल्यास मीं उसासा
घुमेल तो पांचदां,
पडतील कानीं तितके वेळां
त्याचे पडसाद
आणि झाली नव्हती कधीं
अशी जाणीव मला होईल
स्वतांच्या दुबळेपणाची !
ही जाणीव वागवून
कसें मला जातां येईल
आलों त्या वाटेनें
आपल्या घराला परत ?

दरीच्या पडसादाची
प्रचीति पहायला
उच्चारीन मी
निराळे शब्द
—शीण घालविणारे—
— निदान तो न वाढविणारे ! —

* * *

## आविष्कार

[ मुक्तछंद ]

व्याध, रोहिणी यांच्यासारखे
रंगीबेरंगी अनेक तारे
आहेत नभीं.
परंतु काय दिसे सुदूर
त्यांपलीकडे ?
— तमावांचून काय दुसरें
तें असायचें ?

काळ्याकभिन्न काळोखांतून
रंगीबेरंगी, सुंदर तारे
जन्म पावती :
— याचेंच वाटे भारी नवल !

अथवा यांत नवल तरी
काय मानावें ?
हा न तिमिर माझ्यासारख्या
पामराचिया झोंपडींतला !
— परि तो आहे थोराघरचा !

थोरावरच्या तमांतूनही
थोरच कसें न हो निर्माण ?

विश्व व्हायच्या आधींपासून
अवकाशींच्या तिमिरामधें
तेजाचीं बीजें
आहेत मूळ भिसळलेलीं !
— त्याच तेजाचा नवलाईचा
हा आविष्कार !

* * *

## भिवया

[ मुक्तछंद ]

चित्रकारानें चित्रामधल्या
चंद्रमुखीच्या भिवया
धनुष्याकृति रेखिल्या.
त्या रेखतांना सहजपणें
त्याच्या मनांत आला विचार :

" कमानदार भिवयांमधें
सौंदर्य वसे;
कैंचें सरळ भिवयांत तें ?
वक्र रेषेंत जी जादु असे,
ती न सरळ रेषेभीतरीं —
याची जाणीव आहे आम्हांला
चित्रकलेच्या उपासकांना.
परि कुठून जाणीव ही ये आम्हांत ?
असे कशांत तिचा उगम ?

त्या महातत्त्वीं आहे आपला निवास.
त्यापासून कां हो संक्रमित
आम्हांमधें ही जाणीव ?
कुणा ठाऊक ! ”

चित्रकाराचा विचार राही अपुरा
जेव्हां भिवया झाल्या पुरत्या रेखून.

* * *

## इच्छा

चित्रीं दिसे चक्र कर्णाच्या रथाचें धरेनें गिळिलें :
कुंठित होऊन गति तें सदाचें स्थिरता पावलें !
जरी मी इच्छितों स्थिरता यावया मन्मनालागून ,
नको, नको अशी स्थिरता क्षणही चैतन्यविहीन ! १

बौद्धांच्या शिल्पांत दिसे धर्मचक्र खोदलें—कोरलें :
गति असे तया जरी वरवर तें स्थिर भासलें !
वेगवती गति कारण होतसे त्याच्या स्थिरतेला ,
चैतन्यें भरली अशीच स्थिरता हवी मन्मनाला ! २

* * *

## दुपार

[ मुक्तओंवी ]

झाडांना आहे जीव ,
त्यांना आहे संवेदना ,
पण नाहीं त्यांच्यांत जाणीव !

त्यांच्या ठिकाणीं आहे
काळीकुट्ट रात्र
नेणिवेच्या अवसेची !
नाहीं त्या रात्रीला अंत,
नाहीं तींतून फुटणार
पहाटेचा प्रकाश !

मानवांत झाली आहे
जाणिवेची सकाळ.
पण नको त्यानें तेवढयानें
झाडांना हंसायला,
आत्मसंतुष्ट व्हायला !
सकाळ जशी नव्हे
अवसेची रात्र,
तशीच ती नव्हे
लख्ख प्रकाशाची दुपार—
—शिखरीभूत अवस्था—!
आणि ही सकाळ देखील
झाली आहे कुंद-धुंद
दाट चिकाळ धुक्यानें !
म्हणून या सकाळचा
मंदावला आहे प्रकाश,
थंडावली आहे ऊब !

जाणिवेची परिणति
'अति जाणिवें'त झाल्यानें
होते सकाळची दुपार !
ही दुपार होतां होतांच
विरून जातें धुकें,

पडतो लख्ख प्रकाश,
मिळते सुखद ऊब !
नाहीं या दुपारला अंत,
नाहीं तिला सांज–रात !
—अवसेच्या रात्रीचें ३५
मग बोलणेंच काय ?

* * *

## शल्य

नभोवाणीवर आज तुझे शब्द मीं पुन्हां ऐकले,
ते ऐकून माझें चित्त घडिभर आनंदित झालें.
परंतु लगेच आनंदाची जागा घेतली दुःखानें :
कारण अभाव जाणवूं लागला तुझा तीव्रतेनें ! १

तुझ्या दर्शनाची असोशी पुरली असती कांहींशी,
जर तुझे शब्द जाहले असते गोचर नेत्रांशीं !
परि संवेदना एका इंद्रियाची व्हावी दुसऱ्यास —
इतकी क्षमता कुठली असेल मला पामरास ? २

होऊनही मज शब्दसौंदर्याचा असा साक्षात्कार
शल्य सलायचें तें सलत राही हृदीं खोलवर ! ३

* * *

## घड्याळ

अणुगोल पडतांच नागासाकीमधें
जो प्रलय झाला, वाचे त्यांतून घड्याळ
भिंतीवर टांगण्याचें. मात्र तें हो बंद !

स्मृतिचिन्ह म्हणून तें आहे ठेवलेलें
अजूनही त्या नगरीं.
बंद पडलेलें
घडयाळ न मोजी—मापी आतां कालगति !
खोटें नच, म्हटल्यास : त्याच्या लेखीं होई
काल लुप्त !
अणुयुद्ध झाल्यास मानव
विनष्ट हो !—आणि मग कालही नुरेल !
मानवच लया जातां कालाची जाणीव
व्हावी कुणा ?—काय न हा मृत्यूच कालाचा ?

कालमुक्त दशा आहे अत्युत्तम. परि
यावयास पाहिजे ती जीवंतपणांत;
तिच्यासाठी नको व्हाया मानव निर्मूल !

* * *

## धागे तुटतांना

होतों मी जखडलों जगाशीं शतशत ज्या धाग्यांनीं,
तुटत तुटत ते चालले एकएक दिनोदिनीं ! १
कशाला मी नव्हतों धाग्यानें जखडलों जगतांत ?
—झाडांना, पक्ष्यांनाही मिळालें होतें स्थान जीवनांत ! २
रंगाचें, सुवासाचें आणखी इतरही सौंदर्याचें
लागून वेड धागे जडले जीवालागीं सकलांचे ! ३
दिधला मला त्यांनीं आनंद अनुपम आजवर,
म्हणून वाटचाल जाहली जीवनाची सुखकर ! ४
हे धागे तुटतांना दुःख न कसें होई मन्मनाला ?
—सोसतों तें स्मरून आनंद अवघ्यांनीं दिधलेला ! ५

* * *

## उपासना

मीं कधीं म्हटलें : माझी सौंदर्याची
उपासना आहे शाश्वताची ? १
माझ्या आवडीचीं फुलें प्राजक्ताचीं
हातीं घेतांक्षणीं सुकायचीं ! २
आवडीचे रंग उषेचे—संध्येचे
दिसतां दिसतां लोपायचे ! ३
कसें मग म्हणूं : माझी सौंदर्याची
उपासना आहे शाश्वताची ? ४
अशाश्वताचीच माझी उपासना
ना खेद ना खंत लव मना ! ५

* * *

## ‘ अर्थ द्याया ’

[ सुनीत ]

केव्हां तरी ताराविश्वें अवकाशांतील
विघटन होत होत विलया जातील :
अंतर्भूत नभोगंगा आपली तयांत
होऊनिया जावयाची तीही लयाप्रत !

विझतां त्या सर्व ज्योति तम आणि शीत
दाटतील चहूंकडे शून्य पोकळींत !
तारांकित नभाखालीं राहून आपणा
त्या भीषण अवस्थेची कशी ये कल्पना ?

महानाशीं कालासही येईल मरण,
मग तेथें जीवसृष्टि राहील कुठून ? १०

ब्रह्मांडाची ही अखेर होतां आकलन
मानवाचें अस्तित्वच वाटे अर्थहीन !

अस्तित्वास अर्थ द्याया सौंदर्य शाश्वत
कल्पून मी मग्न होतों त्याच्या चिंतनांत !

* * *

## हळूंहळूं

विश्वांतलें सौंदर्य जरी वाटे भंगुर,
शाश्वताची ती आहे सांवली.
अशाश्वत विश्वाशीं निगडित झाल्यानें
भंगुरता त्या प्राप्त जाहली. १

असूनही भंगुर विश्वांतल्या सौंदर्यें
मोद मज आजन्म दिधला.
कसें सांगूं ?—जीवन जगण्याची क्षमता
त्याच्यामुळें लाभली मजला ! २

विश्वासवें त्यांतलें लोपो लोपे सौंदर्य,
न शाश्वत सौंदर्यी बदल :
उगमाशीं विश्वाच्या जें जें असे शाश्वत,
त्यांत स्थान तयाचें अढळ ! ३

विश्वांतलें सौंदर्य शाश्वताची सांवली
समजून पूजितों तयातें :
अशाश्वतीं शाश्वत पाहण्याची संवय
हळूंहळूं हो आतां चित्तातें ! ४

* * *

## ओढ

भय न मृत्यूचें म्हणतों मी वाचे ! १
परि शाश्वताची ओढ कां सदाची ? २
कां ही हुरहूर जीवा अनावर ? ३
मृत्युभय मनीं, त्याची कां निशाणी ? ४
कीं माझ्या भीतरीं वसे कांहीं तरी– ५
ज्याशीं शाश्वताचें नातें जवळचें ? ६
म्हणून कां ओढ त्याची लागे दृढ ? ७

* * *

## साधना

बाह्य जगीं जें जें आहे असुंदर,
तें तें सारें व्हावयाचें केव्हां दूर ?
त्या कार्यास कसा माझा हातभार
लागणार ? १

आहे माझ्या अंतर्जगीं असुंदर :
तें पुरून उरे मज जन्मभर !
नको काय करावया तेंच दूर
अगोदर ? २

ती साधना चालू आहे निरंतर :
—सुंदराच्या भक्तीचाच हा प्रकार !—
यश थोडें, अपयश जरी फार,
मी निर्भर ! ३

* * *

[ सुनीत ]

मागल्या युगांत होतास म्हणशी,
पुढला मृत्यूही पाहिला सांगशी !
काय तीन्हीं रूपें काळाचीं तुजला
एका वर्तमानीं आलीं प्रत्ययाला ?
त्यालाच शाश्वत काल म्हणताती,
त्याच्या जाणिवेनें उरे मृत्यु–भीति !
म्हणून तुकया ! जितेपणीं तुला
मृत्यु दिसून तो सोहळा वाटला !

दिव्य अनुभूति ती तुझी कुठून
यावयाची मला पामरालागून ?
परंतु मृत्यूच्या ज्या अटीवरती
नियतीनें मला धाडिलें जगतीं,
ती अट आनंदें मी पाळूं इच्छितों :
म्हणून मृत्यूतें मीही नच भितों !

* * *

## तरी

मजलागीं जरा येवो ये जरी :
तडागाच्या पृष्ठभागीं सुरकुत्या लाटांच्या,
तरी हृदीं चंद्रबिंब तो धरी ! १

* * *

## पावलें

तांम्हनामधील केशरी गंधांत
प्रभूचीं पावलें उमटलीं काय—भक्त शोधतात :
मग त्या गंधाच्या निर्गुणपादुका ते करूं इच्छित ! १

आकाशामधील संध्येच्या रंगांत
सौंदर्यदेवीचीं चरणचिन्हें मी सोत्कंठ शोधीत :
मग त्या रंगाच्या मानसपादुका मी करूं इच्छित ! २

* * *

## असोशीं

लाटांच्या, अणूंच्या विरोधी रूपांत
प्रकाशा ! तूं होशी प्रतीत.. १

न कळे केधवां तुझियासमान
विरोधी रूप मी लाहीन ? २

असून नसावें— इच्छा वागे मनीं
व्यक्तित्व जावया लोपूनी ! ३

मग जगा माझें विस्मरण होई,
तेवींच जगाचें मलाही ! ४

प्रकाशा ! केधवां तुझियासमान
विरोधी रूप मी लाहीन ? ५

* * *

# प्रो. फ्रेड हॉइल यांस

[ सुनीत ]

विश्वसातत्य होतें संमत जेधवां,
त्याचा हर्ष न तुम्ही मानला तेधवां.
आतां गणितां तुम्ही विश्वातें विनाशी,
परि त्याचाही खेद न लव तुम्हांशीं !
विज्ञानीं तुम्ही विज्ञानवेत्ते चित्तांत
अलिप्ततेचा भाव ठेवतां सतत.
शोधांकारणें हर्षखेद न म्हणून
—विज्ञानांतल्या योगाचेंच हें साधन !

विज्ञानयोगी ! अलिप्तता ही तुमची
आम्हां शिकवा साध्य कराया सदाची.
ती साध्य होतां—नच हुरळूं सुखानें,
ती साध्य होतां—न मरगळूं दुःखानें !
मग स्वतांच्या—छे, विश्वाच्याही !—नाशाची
जाणीव भय देईल आम्हां कुठची ?

* * *

# निहालांची टोळी

[ मुक्तओंवी ]

१

हेंच तें वडाचें झाड
लांब लांब पारंब्या असलेलें
बाण नदीच्या कांठचें.
याच्याच खालीं बाप्पांनीं
काढला आहे आश्रम
निहालांसाठीं—
सुटायला त्यांची संवय
उभें पीक कापण्याची,
खळें लुटण्याची,
कणगी फोडण्याची
आणि लागायला त्यांना संवय
कमाईचें खाण्याची.

२

आहे रात्र काळोखी,
पण आश्रमांतील
खांबावरच्या दिव्यामुळें
दिसतात तेथल्या झोंपड्या,
दिसतात दोन कणग्या
आणि दिसते थोडी दूर
विटा भाजण्याची भट्टी
अजून धुमसणारी.

अल्पारंभ म्हणून
कुरशा आणि बेऱ्या
हे जे दोन निहाल
ठेवले बाप्पांनीं आश्रमांत,
केली त्यांची त्यांनीं
दीर्घकाळची बेगमी
कणग्या भरून जोंधळ्यांनीं;
आणि केला सुरू त्यांच्यासाठीं
विटा बनविण्याचा धंदा
नदीच्या कांठावर.
आहे ही पहिलीच भट्टी
तयार होत आलेली.

## ३

ते पहा बाप्पा
झोंपले आहेत खाटेवर
उन्हाळ्यामुळें उघड्यांत.
कणग्यांपाशीं दिसतात
कुरशा, बेऱ्या झोंपलेले
नुसत्या जमिनीवर
उशाखालीं घेऊन हात.

उलटली मध्यरात्र,
वाहूं लागला गार वारा.
सरकूं लागल्या हळूंहळूं
अंधारांतून आश्रमाकडे
काळ्या काळ्या आकृति—
कुरशा, बेऱ्या यांच्याशीं

संगनमत केलेल्या
त्यांच्या टोळींतील निहालांच्या.
येतांच ते निहाल जवळ
उठले खडबडून
कुरशा, बेन्या.
झोंपले होते कसले ?
होते ते जागेच
झोंपेचें सोंग घेऊन !
झाली निहालांत कुजबुज,
झाल्या खाणाखुणा.

## ४

विझविला कुरशानें
खांबावरचा दिवा.
घेतले कुरशा, बेन्या यांनीं
जवळचे दोन मोठे धोंडे,
गेले ते थबकत थबकत
बाप्पांच्या खाटेकडे.
राहिले ते उभे
त्यांच्या उशाशीं.
करतांच बाप्पांनीं हालचाल
होणार होता त्यांच्या मस्तकाचा
पुरता चेंदामेंदा
त्या दोघांच्या हातांतील
प्रचंड धोंड्यांनीं !

५

तिकडे निहालांनीं फोडल्या
जोंधळ्याच्या कणग्या
आवाज न होऊं देतां.
भरूं लागले ते जोंधळे
घोंगड्यांत, पोत्यांत.
घेऊन ओझें आपापलें
लागला व्हायला पसार
एकेक निहाल
आश्रमांतून.
झाल्या कणग्या रिकाम्या
थोड्याच वेळांत !

हळूंच एक निहाल
गेला कुरशा – वेन्यांकडे,
केली त्यानें जवळून त्यांना
काम संपल्याची खूण.
हातांतील धोंडे
खाटेखालीं हळूंच ठेवून
झोंपलेल्या बाप्पांकडे
पाहत पाहत
गेले ते कणग्यांकडे.
—क्षणांत कुरशा, वेन्या
आणि उरलेले निहालही
झाले अदृश्य अंधारांत !

६

मध्यंतरीं बाप्पांना
लागली होती चाहूल,

आली होती जाग.
किलकिले करून डोळे
घेतलें त्यांनीं पाहून.
दिसले त्यांना कुरशा, बेऱ्या,
ओळखलें त्यांनीं उभयतांना.
आली त्यांना कल्पना
निहालांच्या टोळीच्या धाडीची !
गंभीर प्रसंग जाणून
राहिले ते पडून तसेच
झोंपल्यासारखे !
कुरशा, बेऱ्या गेल्याचें
निदर्शनास येऊनही
रात्र संपेपर्यंत
होते ते जागच्या जागीं
डोळे मिटून पडलेले !

७

पूर्वेकडे तांबडें फुटून
ऐकूं येऊं लागला
पक्ष्यांचा किलबिलाट
वडाच्या झाडावरून;
ऐकूं येऊं लागली
कोंबड्यांची बांग
पैलतीरावरच्या
खेड्याकडून
आणि ऐकूं येऊं लागले
शेतांत नांगर नेणाऱ्या

शेतकऱ्यांचे शब्द
आणि बैलांच्या घंटा.
उठले बाप्पा खाटेवरून,
फिरले इकडे तिकडे
आश्रमांत.
आढळल्या त्यांना कणग्या
फोडून लुटलेल्या;
आढळल्या दोन्ही झोंपड्या
कुरशा, बेऱ्या यांच्या
अगदीं रिकाम्या !
—गाडगीं-मडकीं देखील
उरलीं नव्हतीं तेथें !—

वळले नंतर बाप्पा
आपल्या झोंपडीकडे.
उघडलें त्यांनीं दार,
शोधलें आंत बारकाईनें :
नव्हतें कांहींच नेलेलें
निहालांनीं तेथून !
नित्याच्या संवयीप्रमाणें
केली होती त्यांनीं चोरी
फक्त जोंधळ्याची
जाळायला पोट !

कुरशा-बेऱ्यांसाठीं
राखून ठेवलेल्या कणग्या
टोळीकडून लुटल्या जाण्यांत
व्हावें त्यांनीं सहभागी—
याचें मात्र बाप्पांना

वाटलें नवल !
जास्तच वाटलें नवल
कुरशा, बेन्या त्यांच्या
प्राणांवर उठल्याचें !

८

आले बाप्पा झोंपडीबाहेर,
गेले पुन्हां कणग्यांकडे
आणि राहिले पाहत
शून्य दृष्टीनें
किती तरी वेळ
दूरवरच्या सातपुड्याच्या
निळ्या—निळ्या,
तुटक-तुटक रांगांकडे—
जेथें माग न लागण्यासाठीं
जातात मुद्देमालासह
मोठी चोरी केलेले निहाल,
मिसळतात तेथल्या जमातींत
आणि घेतात वाटून
आणलेली लूट !

* * *

९५५६८

# टीपा

[ प्रस्तुत संग्रह माझें कवितेचें पांचवें पुस्तक होय. त्यांतील ६२ कवितांपैकीं क्रमांक २६, ३९ व ४६ या तीन कविता मासिकांतून प्रसिद्ध झाल्या असून उरलेल्या ५९ कविता येथें प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. ]

## ( अ ) स्पष्टीकरणात्मक

**शेतांत, निहालांची टोळी**—विदर्भात 'निहाल' नामक गिरिजन राहतात. इंग्रजी राजवटींत त्यांची गुन्हेगार जमातींत गणना होत असे. निहाल हे टोळ्यांनीं उभें पीक कापण्यासारख्या धान्याच्या चोऱ्या करीत असत. ते इतर वस्तूंच्या चोऱ्या सहसा न करतां मुख्यतः धान्याच्या चोऱ्या करीत असत, यावरून त्यांच्या गुन्ह्याचें विशिष्ट स्वरूप कळून येईल. अलीकडे त्यांच्यांतील चोरीची वृत्ति कमी होत आहे.

निहाल रंगानें काळे व स्वभावानें आळशी, पण कांहींसे क्रूर आहेत. ते उत्कृष्ट नेमबाज आहेत. त्यांची स्वतंत्र भाषा असून तींत सुंदर गाणीं आहेत. ते स्वतःला हिंदु समजतात. त्यांच्यांत कुरशा, बेऱ्या अशीं पुरुषांचीं व कमी, झुबली अशीं स्त्रियांचीं नांवें असतात. निहालांचा समाजशास्त्रदृष्ट्या अभ्यास अजून व्हावयाचा आहे.

' निहालांची टोळी ' रचनेंतील प्रसंग पश्चिम विदर्भात घडल्याचें कल्पिलें आहे. त्याला वास्तवाचा आधार आहे.

**इंद्रधनुष्य**—सर्पाच्या मस्तकांतील मण्यापासून इंद्रधनुष्य निघतें, ही लोकसमजूत या कवितेंत आधारास घेतली आहे.

**बाउल**—बंगालमधील भक्तिमार्गी. ईश्वराचा–' मनेर मानुष ' याचा–शोध घेण्यासाठीं ते एकतारीवर भजन गात फिरतात.

**घड्याळ**—नागासाकीवर ता. ९-८-१९४५ रोजीं सकाळीं ११ वाजून २ मिनिटांनीं ॲटमबॉंब पडला. तेव्हां बंद पडलेलें एक मोठें घड्याळ अजून जपून ठेवलेलें आहे. या घटनेला १९६५ मध्यें वीस वर्षें झाल्याच्या निमित्तानें 'इलस्ट्रेटेड वीकली' मध्यें या घड्याळाचें छायाचित्र प्रसिद्ध झालें होतें, तें पाहून ही कविता सुचली.

**अट**—'ब्रह्मज्ञान जरी एके दिवशीं कळे' या अभंगांत तुकाराम म्हणतो कीं, मेरुशिखरावर शुकानें जेव्हां समाधी लावधि, तेव्हां आपण तेथें होतों! प्रथम चरणाचा हा संदर्भ आहे. दुसऱ्या चरणाचा संबंध 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां' या प्रसिद्ध अभंगाशीं आहे.

**पावलें**—दत्त संपद्रायांत 'निर्गुणपादुका' स्थापन करण्यासाठीं दिवसा होमहवन वगैरे करून रात्रीं ताम्हनांत विपुल गंध घालून तें ताम्हन बंद खोलींत ठेवतात. मध्यरात्रीं गंधांत प्रभूचीं पदचिन्हें उमटतात, अशी भक्तांची श्रद्धा असते. याच गंधाच्या पादुका करून पावलाच्या आकाराच्या चांदी वगैरेच्या डब्यांत त्या ठेवतात.

**असोशी**—लहरी व अणु अगर परमाणु परस्परविरोधी असूनहि त्या उभयतांच्या रूपानें प्रकाश आपणास प्रतीत होतो, असें विज्ञान सांगतें. 'असणें' व 'नसणें' या अशाच परस्परभिन्न अवस्था असून त्या उभयतांच्या रूपानें आपण रहावें-म्हणजेच 'असून नसावें'-ही इच्छा या कवितेंत दर्शविली आहे.

**प्रो. फ्रेड हॉइल यांस**—डॉ. जयंत नारळीकर यांचे गुरु व सहकारी विख्यात शास्त्रज्ञ प्रो. फ्रेड हॉइल हे आरंभीं 'स्थिरस्थिति-सिद्धांता'चे-Steady State Theory चे-पुरस्कर्ते होते. पण १९६५ च्या उत्तरार्धांत त्यांनीं हा सिद्धांत सोडून 'विस्फोट सिद्धांता'चा-Big Bang Theory चा-अंगीकार केला. प्रथम सिद्धांतानुसार विश्वांत सातत्य असल्यानें तें नेहमीं राहतें, तर दुसऱ्या सिद्धांतानुसार विश्वांत सातत्य नसल्यानें तें अखेर विलयास जाईल!

प्रो. हॉइल यांचें मतांतर म्हणजे बौद्धिक प्रामाणिकपणाचा आदर्श होय.

## ( आ ) छंदोविषयक

संग्रहांतील कांहीं कवितांत नवीन छंद आले आहेत. येथें फक्त दोनच उदाहरणें देतों :

'मनोरा' कवितेंत प्रतिचरणीं १४ अक्षरें येतात. चरणाचा छंदोलेख असा—

॥ ३ । ४ ॥ ४ । ३ ॥

'मूळ' कवितेंत मोठ्या चरणांत १४ व लहान चरणांत ७ अक्षरें येतात. दोन्ही चरणांचा छंदोलेख असा—

॥ ३ । ४ ॥ ४ । ३ ॥
॥ ४ । ३ ॥

इतर नवीन छंदांची मोडणी लक्षांत घेऊन रसिक वाचक ते छंद असलेल्या कवितांचा आस्वाद घेतील, अशी आशा आहे

* * *

१५५६८
REFBK-0015568
REFBK-0015568